# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
## शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा
## पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org Email: roaurangabad@dtemaharashtra.gov.in

प्रथम प्राधान्याने
विधानसभा/विधान परिषद कामकाज

जा.क्र.विकाऔ/**आस्था-३**/२०१८/ 0४२
दिनांक :- 27 FEB 2018

**प्रत,**
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/ शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
उपसिचव, तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेत, औरंगाबाद,जालना,अंबड, जिंतूर,हिंगोली,नांदेड, बीड,उस्मानाबाद, पु.ला.लातूर शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर

**विषयः**-विधान मंडळाचे सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन विधान मंडळाशी संबधीत जबाबदार अधिकारी/कर्मचा-यांच्या नियुक्तीबाबत.

**संदर्भः**- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र. १२(२)/आस्था/अधिवेशन/२०१८/३६१, दि. १६-०२-२०१८

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, दिनांक २६ फेब्रुवारी २०१८ पासून मुंबई येथे सुरु होणारे विधान मंडळाचे सन २०१८ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाचे तातडीचे कामकाजासाठी लागणारी माहिती त्वरेने व बिनचुक सादर करण्यासाठी आपल्या संस्थेतील जबाबदार अधिकारी/ कर्मचा-यांची नेमणूक करुन त्यांना अधिवेशनाचे कामकाज संपेपर्यंत कार्यालयात उशिरापर्यंत थांबण्याबाबत आदेश देण्यात यावेत. जेणे करुन आपल्या संस्थेसंबंधी मागितलेली माहिती तात्काळ पाठविणे सुलभ होईल. सोबत सदर अधिवेशनासाठी उशिरापर्यंत थांबणा-या संचालनालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे नियुक्तीबाबतचे आदेश जोडण्यात येत आहेत.

**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

प्रतः- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच हे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,

3,, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 262 0601, 269 0602, 2641150/51, फॅक्स - 2690007

E-mail : 12desk@ dtemaharastra.gov.in Internet :www.dtemaharastra.gov.in


**प्रथम प्राधान्याने**
**विधानसभा/ विधान परिषद कामकाज**
**कार्यालयीन आदेश**

क्रमांक : 12(2)/आस्था/अधिवेशन/2018/ ३६९
दिनांक : 16 FEB 2018

विषय : महाराष्ट्र विधान मंडळाचे सन 20178 चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन विधान मंडळाशी संबंधीत जबाबदार अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबत..

संदर्भ : शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग पत्र क्र. विमंअ 2018/प्र.क्र.06/साशि 2, दि. 5.2.2018

महाराष्ट्र विधान मंडळाचे सन 2018 चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन मुंबई येथे दिनांक 26.2.2018 पासून सुरु होत आहे. सदर महाराष्ट्र विधान मंडळाच्या अधिवेशनाचे तातडीचे कामकाज पाहण्यासाठी खालील अधिकाऱ्यांची त्यांच्या नांवासमोर निर्देशित केलेल्या दिवशी जबाबदार अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. तसेच त्यांना सहाय्य करण्यासाठी खाली दर्शविलेल्या अधिकारी तसेच लघुलेखन, टंकलेखन व दुरध्वनी या व्यवस्थेसाठी खालील कर्मचारी त्यांच्या नावांसमोर निर्देशित केलेल्या दिवशी कार्यालयीन वेळेनंतरही अधिवेशनाचे कामकाज सुरु असेपर्यंत कार्यालयात थांबतील. तसेच अधिकाऱ्यांनी अधिवेशन काळात मुख्यालय सोडू नये असेही आदेश त्यांना देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव व पदनाम | अधिवेशन काळात थांबण्याचा दिवस |
|---|---|---|
| 1 | श्री. ए.व्ही. आमटे, निरीक्षक | सोमवार |
| 2 | श्री. ए.व्ही. आमटे, निरीक्षक | मंगळवार |
| 3 | श्री. सु.भा.शिरभाते, सहाय्यक संचालक (तां.) | बुधवार |
| 4 | श्री. सु.भा.शिरभाते, सहाय्यक संचालक (तां.) | गुरुवार |
| 5 | श्री. व्ही.जी. तांबे, सहाय्यक संचालक (तां.) | शुक्रवार |
| 6 | श्री. व्ही.जी. तांबे, सहाय्यक संचालक (तां.) | शनिवार |

| अ.क्र. | सहाय्यक अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नांव | अधिवेशन काळात थांबण्याचा दिवस |
|---|---|---|
| 1 | श्रीमती सु.ग.रणदिवे/ श्रीमती श्र.र. मयेकर/ श्री. व.वि. पाटील | सोमवार |
| 2 | श्रीमती सु.अ.गोसावी/श्री. र.सं.तंवर/ श्रीमती अ.दि.सावंत | मंगळवार |
| 3 | श्रीमती पी.एस. पालेकर/श्री. ध.ता. लोखंडे/श्रीमती गि.शा.साटम | बुधवार |
| 4 | श्री. सचिन चाटे/श्री. अ.ना.उंबरे/श्रीमती सा.सं. सकपाळ | गुरुवार |
| 5 | श्री. कुं.ग.एडके/ श्रीमती सु.सु. परब/ श्री. दा.ल.शेळके | शुक्रवार |
| 6 | श्री. सं.शि. खुळे/श्री. अ.र.हरके/श्री. सु.ह.केतकर | शनिवार |

खालील कर्मचाऱ्यांनी आवश्यकतेनुसार लघुटंकलेखन, टंकलेखन व दूरध्वनीचालन करावे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | अधिवेशन काळात थांबण्याचा दिवस |
|---|---|---|
| 1 | श्रीमती स्वा.चि. पेडणेकर, लघुलेखक (उ.श्रे.) | सोमवार |
| 2 | श्रीमती अ.रा. नाईक, लघुलेखक (उ.श्रे.) | मंगळवार |
| 3 | कु. सु.चं.भगत, लघुलेखक (नि.श्रे.) | बुधवार |
| 4 | श्रीमती शै.आ. बाचिम, लघुलेखक (नि.श्रे.) | गुरुवार |
| 5 | श्रीमती स्वा.चि. पेडणेकर, लघुलेखक (उ.श्रे.) | शुक्रवार |
| 6 | श्रीमती अ.रा. नाईक, लघुलेखक (उ.श्रे.) | शनिवार |

D:\sumita\assembly\order 2018.docx

तसेच अधिवेशन काळात या कार्यालयातील वाहनचालक श्री. ध.सु.चिकाटे यांनी सोमवार ते शनिवार या दिवशी कार्यालयीन वेळेनंतरही अधिवेशन संपेपर्यत कार्यालयात थांबावे व त्यानंतर संबंधीत अधिकाऱ्यांची परवानगी घेवून कार्यालय सोडावे.

तसेच वरील यादीत न दर्शविलेल्या इतर कर्मचाऱ्यांना गरज भासल्यास विधीमंडळाच्या अधिवेशनासाठी उशीरापर्यत थांबावे लागेल.

वरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी विधानमंडळाच्या अधिवेशन कालावधीत कार्यालयीन वेळेनंतर कार्यासन क्रमांक 4 मध्ये बसावे व आवश्यक असल्यास त्या कार्यासनामधील संगणकाचा वापर करावा. तसेच त्यांना नेमून दिलेल्या दिवशी काही अपरिहार्य कारणामुळे कार्यालयात उपस्थित राहणे शक्य होणार नसेल तर त्यांनी सदर दिवसाची रजा पूर्व परवानगीने मंजूर करुन घेणे बंधनकारक राहिल. पुढे असेही नमूद करण्यात येते की, सदर कालावधीसाठी आपापसात लेखीरित्या पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे व त्या दिवशी अधिवेशन काळात थांबणाऱ्या अधिकाऱ्यास त्याप्रमाणे कळविणे आवश्यक आहे.

तसेच सर्व कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, अधिवेशन काळात तातडीचे कामकाज पाहण्यासाठी दररोज प्रत्येक कार्यासनासतील कार्यासन अधिकारी यांनी आवश्यकतेनुसार त्यांच्या कार्यासनातील एका कर्मचाऱ्यांस अधिवेशन काळात कार्यालयीन वेळेनंतरही अधिवेशनाचे कामकाज संपेपर्यत कार्यालयात थांबवावे.

विधान मंडळाच्या दिनांक 26.2.2018 पासून मुंबई येथे सुरु होणाऱ्या अधिवेशनासाठी विधानमंडळ कार्याशी संबंधीत तातडीचे काम पाहण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी जबाबदार अधिकारी म्हणून खालील अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. विधानमंडळाच्या कामकाजासंबधी आवश्यकतेनुसार संपर्क साधण्याकरीता त्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक/ ईमेल आयडी खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पदनाम | कार्यालयीन दूरध्वनी क्र. | भ्रमणध्वनी क्र. | ई मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. सिध्दार्थ खरात | सहसचिव | 022-22835597/3556 | 9930165657 | sidharth.kharat@nic .in |
| 2 | श्रीमती गीता चव्हाण | कक्ष अधिकारी | 022-22793167 | 9819850589 | geeta.chavan@nic.in |

विधान मंडळ व विधानपरिषद प्रश्नोत्तरे व शासनाकडील संबंधित कागदपत्रे वेळोवेळी प्राप्त करण्याच्या कामावर, श्री. ह.दे. चव्हाण, प्रशासकीय अधिकारी यांनी सोमवार, मंगळवार, बुधवार व श्री. प्र.मा.भंडारवार, सहाय्यक संचालक (अतां)यांनी गुरुवार, शुक्रवार, शनिवार या दिवशी देखरेख ठेवावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :

1. मा.अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
2. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
   त्यांना कळविण्यात येते की, विधानमंडळाच्या कामकाजासाठी लागणारी माहिती त्वरेने व बिनचूक पाठविण्यासंबंधी त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्था/कार्यालयांना तातडीने कळवावे. तसेच अधिवेशन काळात त्यांच्या कार्यालयातील जबाबदार अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नेमणूक करुन त्यांना अधिवेशनाचे कामकाज संपेपर्यत कार्यालयात उशिरा थांबण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.
3. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई 51
4. संबंधीत अधिकारी/ कर्मचारी व मुख्य कार्यालयातील सर्व कार्यासने, मुख्य कार्यालय, मुंबई 5. (निवडनस्ती)

D:\sumita\assembly\order 2018.docx